CMYK

साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
कार्यालय : शॉप नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर- १८
E-mail : dsahasikngp@gmail.com

श्री.अकील अहमद उर्फ गुड्डूभाई
कार्यकारी संपादक
मो.नं. ९८२२०९४०१४

# दैनिक साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

epaper
www.sahsik.com

**किरायाने देणे आहे**
१) २ हजार ५०० स्के. फुट पक्के बांधकाम असलेले मकान ऑफिस करीता किरायाने देणे आहे.
२) तसेच २१०० स्के. फुट प्लॉट एन.ए.टी.पी. झालेला पद्मावती नगर, आलोडी, ता.जि.वर्धा हा विकणे आहे. करीता खालील पत्यावर संपर्क करा.
मो.क्र. ८८७९७९५७६८

वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १२ अंक : १५७ शुक्रवार २१ डिसेंबर २०१८ मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये

**सुविचार**

" शरीराला श्रमाकडे,
बुध्दीला मनाकडे
आणि
ह्रदयाला भावनेकडे
वळविणे म्हणजे
शिक्षण "

**चारोळी**

माणसं फक्त बदललीत
तोच आहे गाव
डोळे तपकिरीच आहे
बदलले आहेत भाव

**हसा जरा जपून..**

**नातू:-** आजी! मी रनींग रेस मध्ये भाग घ्यायला जात आहे. मला आशीर्वाद दे...
**आजी:-** सावकाश पळ रे बाळा

# ५०० कोटीची जागा बळकाविण्यासाठी न्यायालयात खोटी कागदपत्रे दाखल करणाऱ्या खंडेलवाल इंजि. कंपनीच्या

## सर्व संचालका विरूद्ध फौजदारी गुन्हे नोंद करण्याचे मुंबई जिल्हा व सत्र न्यायालयाचे आदेश



**ॲड.निलेश ओझा**
राष्ट्रीय अध्यक्ष मानवाधिकार सुरक्षा परिषद,मुंबई

* संचालक संजय पटेल व इतर आरोपींविरूद्ध भां.द.वि. १९१, १९२, १९३,१९६, २००, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेश
* न्यायालयीन फसवणूकीचा गुन्हा असल्यामुळे न्यायालयीन अधीक्षक असणार फिर्यादी
* भां.द.वि. ४६७ अंतर्गत आरोपींना आजीवन कारावासाच्या शिक्षेची तरतूद
* अर्जदारास १०० कोटी रू. नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रकरण महानगर दंडाधिकारी यांच्याकडे
* मृत विठ्ठल कोळी यांचे सहा वारस जिवंत असतांना न्यायालयात फक्त ३ वारस उभे करून त्या वारसाकडून दबाव आणून खोटे शपथपत्र (Consent Terms) दाखल केल्याचे चौकशीत उघड
* जागेचे मालक सुरेन्द्र मिश्रा आणी वासुदेव पाटील यांच्या प्रयत्नाला यश : न्याय व्यवस्थेवर विश्वास असल्याचे मत
* खंडेलवाल कंपनीचा त्या जागेवर कधीच ताबा नव्हता आणि मयत विठ्ठल सोवार कोळी हे त्या जागेवर सन १९५७ पासून शेती करीत असल्याचे चौकशीत सिध्द झाल्याने शासनाने विठ्ठल कोळी यांना ३२-एमचे प्रमाणपत्र देवून मालक घोषीत केले आणी त्यांच्या सहा कायदेशीर वारसांनी शासनाची परवानगी घेऊन जागा सुरेन्द्र मिश्रा व वासुदेव पाटील यांच्या साम्राज्य बिल्डर्स या कंपनीस विकली असून खंडेलवाल इंजि. कंपनीचा जागेशी कोणताही संबंध नसल्याचे झाले उघड



**श्री. सुरेंद्र मिश्रा**
मुंबईतील मालाड भागात एव्हरशाईन नगरातील जागेचे मालक



**श्री. वासुदेव पाटील**
मुंबईतील मालाड भागात एव्हरशाईन नगरातील जागेचे मालक

**प्रतिनिधी / २० डिसेंबर**

**मुंबई :** येथील मालाड भागात एव्हरशाईन नगर मधील ५०० कोटी रूपये किंमतीची (३ एकर ३९ गुंठे) खुली जागा बळकाविण्यासाठी न्यायालयात खोटे शपथपत्र व पुरावे देवून वारसदार कोळी व खरे मालक सुरेन्द्र मिश्रा व वासुदेव पाटील, यांना त्यांच्याच जागेत काम करण्यापासून रोखण्यासाठी सन २००७ पासून न्यायालयाची फसवणूक करून तब्बल ११ वर्षे मुळ वारसांच्या दाव्याला विरोध करणारे खंडेलवाल इंजिनियरींग कंपनीचे सर्व संचालका विरूद्ध भां.द.वि. १९१, १९२, १९३, १९६, २००, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७४ आदी कलमाअंतर्गत न्यायालयाच्या वतीने सत्र न्यायालयाचे अधिक्षक (Registrar Session) यांनी फिर्यादी बनून मुंबईचे महानगर न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात केस दाखल करावी, केसचा सर्व खर्च आरोपींनी अर्जदारास दयावा. अर्जदाराच्या १०० कोटी रूपये नुकसान भरपाई संबंधी न्यायदंडाधिकारी यांनी आदेश करावेत असे आदेश मुंबई नगर दीवाणी व सत्र न्यायाधीश के.आर. जोगळेकर यांनी १४ डिसेंबर २०१८ रोजी दिले असून या आदेशाने मुंबईतील बोगस बिल्डर लॉबीमध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मुंबईतील मालाड भागात एव्हरशाईन नगरमध्ये मोक्याच्या ठिकाणी ३ एकर ३९ गुंठे जागा ही विठ्ठल सोवार कोळी यांच्याकडे सन १९५७ च्या आधीपासून ताब्यात होती. त्या जागेवर विठ्ठल कोळी हे त्यांच्या मुलं-मुली आणी पत्नीसह शेती करीत होते. सन १९९४ मध्ये त्यांनी मुंबई कुळ वहीवाट शेत जमीन अधिनियम (BTAL) कायदा १९४८ नुसार तहसीलदार बोरीवली यांच्याकडे अर्ज करून त्यांना जागेचा मालक घोषीत करावे अशी विनंती केली.

बोरीवलीचे तहसीलदार यांनी जिल्हा भूमी अभिलेख निरीक्षक (District Inspector of Land Records: DILR) यांच्याकडून अहवाल बोलाविला नंतर जागेचा

(उर्वरित पान २ वर)

# मोदीच देशाला वाचवू शकतात, चिठ्ठी लिहून तरुणाची



**वृत्तसंस्था / २० डिसेंबर**

**नवी दिल्ली :** हैदराबादमध्ये एका खासगी संस्थेत काम करणाऱ्या ३० वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. संस्थेत वरिष्टांकडून होणाऱ्या छळामुळे त्याने आत्महत्या करण्याचं पाऊल उचलल्याचं समोर आलं आहे. पोलिसांनी याबाबत माहिती दिली.

वृत्तसंस्था पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, मंगळवारी(दि.१८) त्याने सैदाबाद परिसरातील त्याच्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. नरसिंग असं आत्महत्या केलेल्या तरुणाचं नाव आहे. मृतदेहाजवळ सापडलेल्या सुसाइड नोटमध्ये वरिष्टांकडून छळ केला जात असल्याने आत्महत्या करण्याचा निर्णय घेत असल्याचं त्याने लिहिलंय. याशिवाय, पंतप्रधान मोदी हेच देशाचे कायम पंतप्रधान राहावेत:मोदीच देशाला वाचवू शकतात असंही त्याने आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये नमुद केलंय अशी माहिती घटनेचा तपास करणारे पोलीस

(उर्वरित पान २ वर)

# भाजपाला दिलासा, रथयात्रेला कोलकाता हायकोर्टाची परवानगी





**वृत्तसंस्था / २० डिसेंबर**

**नवी दिल्ली :** कोलकाता उच्च न्यायालयाने भाजपाला दिलासा देताना पश्चिम बंगालमध्ये गणतंत्र बचाओ यात्रा काढण्याची परवानगी दिली आहे. पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी सरकारसाठी हा धक्का मानला जातोय.

पश्चिम बंगाल सरकारकडून भाजपाच्या रथयात्रेला परवानगी नाकारण्यात आली होती. या निर्णयाविरोधात भाजपाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. भाजपाच्या रथयात्रेमुळे जातीय तेढ निर्माण होऊ शकतो, असा अहवाल गुप्तचर संस्थांकडून देण्यात आला होता. त्यामुळे यात्रेला परवानगी नाकारली होती असं आज पश्चिम बंगाल सरकारच्या वकिलाने न्यायालयात सांगितलं. त्यावर, भाजपाच्या वकिलांकडून, रथयात्रेला परवानगी नाकारायची हे आधीच ठरलं होतं. परवानगी न देण्यासाठी राज्य सरकारकडून कोणतंही ठोस कारण देण्यात आलेलं नाही. इंग्रजांचं राज्य असताना महात्मा गांधींनी दांडी यात्रा काढली त्यावेळी कोणी त्याना अडवलं नाही, पण हे सरकार राजकीय रॅलीसाठी परवानगी नाकारतंय, असा युक्तीवाद केला. यापूर्वी शनिवारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी

(उर्वरित पान २ वर)





# राहुल गांधी म्हणजे अंगापेक्षा बोंगा जड- पंकजा मुंडे



**वृत्तसंस्था / २० डिसेंबर**

**नवी दिल्ली :** राहुल गांधी म्हणजे अंगापेक्षा बोंगा जड अशी टीका राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री पंकजा मुंडे यांनी केली आहे. तर नाचता येईना अंगण वाकडे ही म्हण राहुल गांधीनाच लागू पडते अशी टीका पूनम महाजन यांनी केली आहे. कलर्स मराठीच्या अस्सल पाहुणे इरसाल नमुने या भागात या दोघींची मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीचे काही अंश सध्या सोशल मीडियावर प्रसारित होत आहेत. याच दरम्यान मकरंद अनासपुरेने या दोघींना म्हणींबाबत एक प्रश्न विचारला. या म्हणी कोणत्या राजकीय नेत्याला लागू पडतात हे तुम्ही सांगा असे म्हणत या म्हणी विचारण्यात आल्या ज्यावर उत्तर देताना राहुल गांधी म्हणजे अंगापेक्षा बोंगा जड अशी टीका पंकजा मुंडे यांनी केली.

कोणती म्हण कोणत्या राजकीय नेत्याला लागू पडते असे विचारताना मकरंद अनासपुरेने पूनम महाजन यांना नाचता येईना अंगण वाकडे या म्हणीबाबत विचारले. त्यावेळी पूनम महाजन म्हटल्या, एका पार्टीचे अध्यक्ष आहेत. खूप प्रयत्न करतात, आज्ञाधारी पुत्रही आहेत. पण कधी कधी बघून वाटतं की त्यांची चूक नाही. ते त्यांचं अंगणही नाही आणि त्यांचा नाचही नाही. नाव घेण्याचा माझा स्वभावच नाही असे पूनम महाजन म्हटल्या तेव्हा लगेचच पंकजा मुंडेंनी पास म्हणता येईल का यावर असा प्रश्न विचारला आणि प्रेक्षकांमध्ये एकच हशा पिकला. तर जनता सूज्ञ आहे जनतेला लगेच कळेल असे पूनम महाजन यांनी म्हटलं आहे.

यानंतर मकरंद अनासपुरे यांनी पंकजा मुंडे यांच्याकडे मोर्चा वळवत त्यांना अंगापेक्षा बोंगा जड ही म्हण कोणत्या राजकीय नेत्याला लागू पडते असा प्रश्न विचारला. त्यावर एकच उत्तर द्यायचं का सगळ्यांनी? असा प्रश्न पंकजा मुंडे यांनी विचारला तेव्हाही प्रेक्षक पुन्हा एकदा खळखळून हसू लागले. तर पूनम महाजन म्हटल्या की दहा म्हणी एका माणसाला लागू पडतात.

एकंदरीतच काय तर या दोघीनींही राहुल गांधी यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीकाही केली. या मुलाखतीत आणखी काय गंमती घडल्या ते समजणार आहेच. मात्र तूर्तास तरी या दोघींनी राहुल गांधींचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधल्याचे समोर आले आहे.

CMYK